**ऑगस्ट ते सप्टेंबर २०२३ आणि ऑगस्ट ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत अतिवृष्टी मुळे घर पडझड, गोठे यांच्या नुकसानीकरिता मदत देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**मदत व पुनर्वसन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२६/प्र.क्र. २९२/ मदत-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २९ सप्टेंबर, २०२६

**वाचा :**

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०२४/प्र.क्र. ४१/मदत-३, दिनांक २७.०५.२०२६
३) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५) /नै. आ. व्य./कावि-३६४/२०२६, दि. ०८.०९.२०२६

**प्रस्तावना:**

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३ अन्वये मदत देण्यात येते.

ऑगस्ट ते सप्टेंबर २०२३ आणि ऑगस्ट ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिके व शेतजमीन वगळून घर पडझड, गोठे यांचे नुकसानीसाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडून अनुक्रमे संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये निधी मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

ऑगस्ट ते सप्टेंबर २०२३ आणि ऑगस्ट ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे शेतीपिके व शेतजमीन वगळून घर पडझड , गोठे यांचे नुकसानीसाठी बाधितांना मदत देण्याकरिता संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडून गोंदिया जिल्ह्यासाठी एकूण रु. ३,४३,३५,०००/- (रूपये तीन कोटी त्रेचाळीस लक्ष पस्तीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्याच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२.	तद्नुषंगाने, शासन निर्णय क्र. एससीवाय-२०२४/प्र.क्र. ४१/मदत-३, दिनांक २७.०५.२०२६ च्या अनुषंगाने, या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात उणे (-) प्राधिकार पत्रावरील सुविधेच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

३.	वरील निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना केंद्र शासनाने चक्रीवादळ, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी. तसेच राज्य शासनाने घोषित केलेल्या अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरिता अतिवृष्टीच्या निकषानुसार मंडळामध्ये २४ तासात ६५ मि.मी.पेक्षा जास्त नोंद झालेली असल्यास ही मदत अनुज्ञेय राहील.मात्र, ज्या ठिकाणी पूर आलेला असेल त्या ठिकाणी अतिवृष्टीचा निकष लागू राहणार नाही.

४.	लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५.	सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

तसेच, NDMIS पोर्टलवर दरमहा भौतिक व आर्थिक उद्दिष्टे यांची माहिती संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे भरण्यात यावी.

६.	हे आदेश सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०९२९१७५४२७७९४१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.09.29 17:55:51 +05'30'

**( सुनिल स. सामंत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) ) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई.

५. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
८. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
९. विभागीय आयुक्त, नागपूर
१०. सह सचिव (मदत), मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय,मुंबई
१२. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१३. जिल्हाधिकारी, गोंदिया
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया
१७. कार्यासन अधिकारी (मदत-३) मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१८. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१९. निवड नस्ती (कार्यासन/ मदत-१)

| मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२६/प्र.क्र. २९२/ मदत-१ , दि. २९/०९/२०२६ सोबतचे विवरणपत्र | | | | |
|---|---|---|---|---|
| विभाग | जिल्हा | प्रस्तावाचा दिनांक | कालावधी | नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित घरांच्या दुरुस्ती / पुनर्बांधणी यासाठी सहाय्य लेखाशीर्ष (२२४५ ०२७१) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| नागपूर | गोंदिया | ०८.०९.२०२६ | माहे ऑगस्ट ते सप्टेंबर २०२३ | रू. ७६.७३ |
| | | | माहे ऑगस्ट २०२४ | रू.१०२.९५ |
| | | | माहे सप्टेंबर २०२४ | रू. १६३.६७ |
| | | | एकूण | रू. ३४३.३५ |

एकूण (अक्षरी रूपये तीन कोटी त्रेचाळीस लक्ष पस्तीस हजार फक्त)

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.09.29 17:56:06 +05'30'

( सुनिल स. सामंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन